REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —का[illegible]

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख १ जानेवारी १९४७ | अंक १


## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ६,७७,३७० |
| एकूण खेळतें भांडवल | „ ५८,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

नांगर —यांचे— चरक

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | राजा ( एक बैली ) |

' मधुकर ' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

## विविध माहिती

**नॅशनल स्टूडिओज लि.**—वरील कंपनीचें वसूल भांडवल १० लक्ष रु. आहे. तिनें गेल्या [illegible] रु. नफा मिळविला. ऑर्डिनरी भागीदारांस १०% (करमुक्त) डिव्हिडंड मिळणार आहे. " सराई-के बहार " हें कंपनीचें चित्र तयार झालें आहे.

**पॅरिसमध्यें बनावट नोटा**—पॅरिसमध्यें पांचशे डॉलरवाल्या बनावट नोटांचा प्रसार, करण्याची [illegible] आहे. तिनें सुमारें १० लक्ष डॉलर्संच्या बनावट नोटा [illegible] आहेत. त्यांबाबत चौकशी करण्यासाठी अमेरिकन तज्ज्ञांना बोलावण्यांत आलें आहे.

**हिंदी सायकलींचें उत्पादन**—युद्धापूर्वी हिंदुस्थानांत दरसाल २,००,००० सायकलींची आयात होत असे. युद्धकाळांत ती आयात थांबली आणि आतां सायकलींना मोठी मागणी निर्माण झाली आहे. दर माणशी सायकलींची संख्या पाहिली तर सबंद जगांत हिंदुस्थानचा अनुक्रम खालून दुसरा लागतो. चीन सर्वांत खाली आहे. हिंदुस्थानांत सायकल तयार करणारे दोन कारखाने आहेत, त्यांचें वार्षिक उत्पादन ५०,००० सायकलींचे वर नाहीं. हें उत्पादन १९४९ असेर २,५०,००० सायकलींवर जाईल अशी अपेक्षा आहे. युद्धापूर्वी आयात होणाऱ्या ब्रिटिश सायकलींची किंमत ६० ते ७० रु. होती, ती आतां ११० ते १२० रु. आहे. आयात जकात २४% पडते. हिंदी सायकल कारखानदारांना संरक्षण द्यावें किंवा नाहीं, ह्याची चौकशी सध्या टारिफ बोर्ड करीत आहे.

**उंच माणसें**—जगांतील सर्वांत उंच मनुष्याची उंची ८ फूट, ३ इंच आहे. तो झेकोस्लोव्हाकियाचा नागरिक आहे. उंचीचें बाबतींत दुसरा अनुक्रम एका ऑस्ट्रियन मनुष्याचा लागतो. त्याची उंची ८ फूट, २ इंच आहे.

**साखरेचें जागतिक उत्पादन**—साखरेचें जागतिक वार्षिक उत्पादन ३ कोटि टन आहे, परंतु सध्या तें २ कोटि, ४० लक्ष टनांवर आलें आहे. १९४६–४७ मध्यें तें २ कोटि, ८६ लक्ष टन भरेल व १९४७–४८ मध्यें तें पूर्वीप्रमाणें ३ कोटि टन भरेल अशी अपेक्षा आहे.

**मोटारींच्या काळ्याबाजाराविरुद्ध मोहीम**—दिल्ली येथें सरकारी वहातुक व व्यापार खात्यांतील अधिकारी व मोटार विक्रेत्यांचे प्रतिनिधी ह्यांचे बैठकींत नवीन मोटारींची, संस्थानें व प्रांत ह्यांच्यांत योग्य प्रमाणांत वाटणी करणें व काळ्या बाजाराला निर्बंध घालणें ह्या दोन मुद्यांवर मुख्यत्वेंकरून चर्चा झाली. युद्धपूर्व योजनेप्रमाणें आपापल्या कक्षेंतील प्रांतांत मोटारी वाटून देण्याबाबत सर्व विक्रेत्यांचें ऐकमत्य आहे. त्याचप्रमाणें, मोटारींच्या आयातीची संख्या व त्यांची प्रत्येक प्रांत व संस्थान ह्यांच्यांत झालेली वाटणी ह्यांचा अहवाल दरमहिन्याला सरकारला सादर करण्याचेंही त्यांनीं कबूल केलें आहे. ग्राहकांच्या सोईकरितां मोटारींच्या किरकोळ विक्रीची किंमत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्यांत येईल. नफेबाजीमुळें फसलेल्यांना मोटार डीलर्स असोसिएशनकडे किंवा मोटारींच्या व्यापाऱ्यांकडे त्याकारणानें तक्रार करितां येईल.

**विजेचें राष्ट्रीकरण**—सिंधमधील विजेच्या कंपन्या तेथील सरकार स्वतःच्या मालकीखालीं आणणार आहे. कारखाना वीज कंपनी सरकारी मालकीची करून १ जानेवारी रोजीं ह्या राष्ट्रीकरणास प्रारंभ होईल.


लग्नसमारंभास व मेजवानीसाठीं
—रुपॉक्सचा—
शुद्ध साखरेचा केशरयुक्त
:: सुधारस ::
वापरा
बाटली किंमत २–८–०
घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.
मागविण्याचा पत्ताः—एम्पायर एजन्सीज,
५५२, सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.



लॉर्ड रे
महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय पुणें
या संस्थेचें
व्यापार संवर्धन–गृह
येथें
विकत मिळणाऱ्या वस्तु

डीक, मध, केशर, शिककाई, चंदन, सुरी, शर्टिंग, कोटिंग, खेळणी, रेशीम, लुगडी, खण, नक्षीकामें, गुंड्या, फण्या, घोंगड्या, खाऊ, भांडीं, फर्निचर, ब्रश, उदबत्ती, तेल, शाली, सतरंज्या, ब्लँकेटें, लॉकर, बाहुल्या, चित्रें, बंगले, चंदनी कामें, विमानें, सरबतें, अमसुलें, आसनें, फुलें, वेण्या, हार, चाकू, कात्र्या, सुऱ्या, स्कार्फ, पेंड, बागेचीं हत्यारें, बॅग्ज, वहाणा, बूट, स्टेशनरी, टपिकागद, सुगंध, चंदन-भुसा, मूर्ति, कातडी, सरस, देव्हारे, फीत, गालिचे, पाकिटें, काठ्या, छड्या, लाकडी चमचे, कंगवे, कॅलेंडरें, चादरी, टॉवेल, पंचे, धोतरें, हातरुमाल, कद, उपरणीं, घायपात, माळा, कारागिरीचीं कामें, स्वेटर्स, मफलर्स, बैल घाण्याचें गोडें तेल.

—अधिक माहितीसाठीं समक्ष भेटा—

ता. ११।११।४६ भा. वि. बारपुरे
व्यवस्थापक



आंध्र खादीचे
(म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २



तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें

# अर्थ

बुधवार, ता. १ जानेवारी १९४७





प्रो. वा. गो. काळे


संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदुस्थानाच्या पौंडी शिलकेचें भवितव्य

युद्धकालांत ब्रिटिश लष्करासाठी ब्रिटननें जो खर्च हिंदुस्थानांत केला त्याच्या बदला इंग्लंडमध्यें हिंदुस्थानच्या नांवावर पौंडी शिलक कागदोपत्रीं जमा करण्यांत आली. ही पौंडांची गंगाजळी हिंदुस्थानला परत मिळण्याचा प्रश्न अजूनपर्यंत भिजत पडलेला होता. ब्रिटनमधील माजी हुजूर सरकारचे पुढारी मि. चर्चिल यांनीं तर परकीय आक्रमणापासून हिंदुस्थानचें रक्षण ब्रिटननें केलें असल्यामुळें वरील गंगाजळी हिंदुस्थाननें परत मागूच नये असें उघडपणेंच बोलून दाखविलें होतें. पण इतकी सोळभुद गुंडगिरी त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणालाच जमणार नसल्यामुळें आतां अखेर या प्रश्नासंबंधीं प्राथमिक चर्चा करण्यासाठी एक ब्रिटिश शिष्टमंडळ १९४७ च्या जानेवारींत हिंदुस्थानांत येणार असल्याचें जाहीर झालें आहे. ब्रिटनच्या शिष्ट–मंडळांत, ब्रिटिश सरकारतर्फे सर विलफ्रिड एडी आणि बँक ऑफ इंग्लंडतर्फे त्या बँकेचे डेप्युटी गव्हर्नर मि. कोबाल्ड, असे दोघे तज्ञ आहेत. हिंदुस्थानतर्फे या वाटाघाटी कोण करणार तें अद्याप जाहीर झालेलें नाहीं.

युद्ध सुरू झाल्यापासून म्हणजे सप्टेंबर १९३९ पासून हिंदुस्थानची पौंडांतील गंगाजळी एकसारखी फुगत गेली आणि ता. १८ नोव्हेंबर १९४६ पर्यंत या ठेवीची रुपयांतील किंमत १,९२३ कोटींपर्यंत पोचलेली आहे. पैसा म्हणजे नोटा अगर नाणें यांचीं अर्थशास्त्रीय व्यवहारांत अनेक कार्यें असतात. त्यांपैकीं शिल्लक ठेवण्याचा एक घटक हें एक महत्त्वाचें कार्य आहे आणि केवळ याच दृष्टीनें पाहिलें तरी हिंदुस्थानची धनकोची अवस्था मोठी हेवा वाटण्यासारखी आहे असा भास झाल्याशिवाय रहाणार नाहीं. पण पैशाच्या व्यवहाराच्या मागें वस्तूंच्या व सुखसोयींच्या देवघेवीचा व्यवहार दडलेला असतो. या व्यवहाराच्या सुलभतेला इष्ट व आवश्यक म्हणूनच अखेर पैशाचा उपयोग असतो. युद्धकालांत तर नियंत्रित अर्थव्यवस्था स्वाभाविकपणेंच अत्यंत कळसाला पोचत असल्यामुळें नुसत्या पैशाच्या व्यवहारावरून कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेच्या आरोग्याविषयीं निदान करणें अत्यंत वेडेपणाचें होईल. ब्रिटनला युद्धकालांत हिंदुस्थानांत जो खर्च करावा लागला त्यांतील बराच मोठा भाग ब्रिटिश व इतर परदेशीय लष्कर यांच्यावर आणि हिंदुस्थानांतील गोऱ्या नागरिकांवर खर्च झालेला आहे. त्यासाठी रिझर्व्ह बँकेनें इंग्लंडमध्यें जमा होणाऱ्या पौंडाच्या तारणावर ब्रिटनला हिंदुस्थानांत रुपये दिले. अर्थात हे रुपये नव्या नोटा छापून दिले हें सांगण्यास नकोच. शिवाय ब्रिटननें हिंदुस्थानांत जो माल खरेदी केला तो नियंत्रित दरानें. हिंदुस्थानला युद्धकालांतील वाढत्या भावाचा फायदा मुळींच मिळालेला नाहीं. या प्रकरणीं खुद्द ब्रिटनच्याच पार्लमेंटरी कमिटीनें, हिंदुस्थानांत खरेदी करण्यांत आलेला माल योग्य भावानेंच खरेदी करण्यांत आलेला आहे असें जाहीर केलेलें आहे. युद्धकालांत उत्पादन वाढून त्यांतून ब्रिटननें खरेदी केली असती तर हिंदुस्थानचें फारसें नुकसान झालें नसतें. परंतु नोटा छापण्याच्या अधिकाराच्या अनिर्बंध उपयोगामुळें उत्पादन न वाढतांच एक प्रकारची कृत्रिम क्रयशक्ती उत्पन्न झाली. त्याचा परिणाम व्हावयाचा तोच होऊन हिंदुस्थानांतील सर्वसामान्य नागरिकांना आपल्या तोंडचे घास काढून ब्रिटिश लष्कराच्या तोंडीं अनिच्छेनें भरवावे लागले. सारांश, राजकीय पारतंत्र्यामुळें, हिंदुस्थानची आज प्राप्त झालेली धनकोची अवस्था आभासात्मक असून वस्तुतः हिंदुस्थान अधिकच दैन्यावस्थेला पोचला आहे. हिंदुस्थानांतील पैशाचा सुकाळ हा वैभवाचा द्योतक नसून आज तरी भावी अनर्थांचा द्योतक होऊन बसलेला आहे. हिंदुस्थानच्या पौंडी शिलकेंतून कोणतीही वजावट न करतां हिंदुस्थानच्या औद्योगिक व शेतकीच्या वृद्धीसाठी तिचा उपयोग करून घेणें अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी इंग्लंडकडून समानतेच्या भूमिकेवरून मदत झाली पाहिजे. शेतीच्या मालाच्या किंमती हिंदुस्थानच्या दारिद्र्यामुळें पडतात, त्यांचा फायदा घेऊन कच्चा माल येथून मातीमोलानें न्यावयाचा आणि पक्का माल मक्तेदारी किंमतींनी विकावयाचा असेंच धोरण सध्याचें मजूर सरकार ठेवणार असेल तर या वाटाघाटींतून हिंदुस्थानला अनकूल असें कांहीं निष्पन्न व्हावयाचें नाहीं. हिंदी शिष्ट–मंडळांतील सभासद या दृष्टीनें विचार करून हिंदी अर्थव्यवस्थेची विपन्न दशा सुधारण्याचा आग्रह धरतीलच. परंतु अखेर या गुंतागुंतीच्या कोड्याची गुरुकिल्ली राजकीय परिस्थितीवर अवलंबून आहे हें विसरतां येणार नाहीं. हिंदुस्थानांत कोणत्याही राष्ट्रीय स्वरूपाचें सरकार अधिकारावर असलें तरी हिंदुस्थानांतील औद्योगिक व शेतीच्या उत्पादनाच्या वाढीसाठी इंग्लंडमधील पौंडी गंगाजळीचा कसा उपयोग करून घेतां येईल याच दृष्टीनें हा प्रश्न सोडविला गेला पाहिजे.

## अन्नधान्याचें दुर्भिक्ष केव्हां संपणार ?

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व शेती संघटननें जगांतील अन्नधान्यांच्या परिस्थितीचा नुकताच एक आढावा घेतला. या आढाव्यांत इतर अनेक मुद्यांबरोबरच एक जुनाच परंतु अर्थशास्त्रीय विचारांतील एक महत्त्वाचा मुद्दा अप्रत्यक्षतः उपस्थित करण्यांत आलेला आहे. चरितार्थाचीं साधनें ज्या प्रमाणांत वाढतात त्याच्यापेक्षा अधिक जलद जगांतील लोकसंख्या वाढते, आणि म्हणून जगांत दारिद्र्य वाढतें असा अर्थशास्त्रीय सिद्धांत प्रथम मालथस यानें मांडलेला सुप्रसिद्धच आहे. वरील संघटनेनें आपल्या आढाव्यांत याच जुन्या पुराण्या आणि आतां अशास्त्रीय ठरलेल्या सिद्धांताचा पाठपुरावा केलेला आहे. पूर्वेकडील देशांच्या अन्नधान्य परिस्थितीसंबंधानें अहवालांत पुढील विचार व्यक्त केलेले आढळतात:–"पूर्वेकडील देशांच्या वाढत्या लोकसंख्येला पुरेसें अन्न कसें पुरवतां येईल हा प्रश्न फार बिकट होऊन बसलेला आहे. या देशांत पुरेसें अन्न पाठविण्यासाठी म्हणजे आयात करण्यासाठी अन्नधान्य गोळा करणें आणि त्याची विभागणी करण्यासाठी पैशाची उभारणी करणें हा मुख्य प्रश्न आहे." पूर्वेकडील देशांतील लोकसंख्या वाढती असली तरी आधुनिक उत्पादनतंत्राच्या साह्यानें त्या देशांतील धान्याचें उत्पादन वाढवितां येईल ही गोष्ट आतां तज्ञांनी मान्य केलेली आहे. अशा परिस्थितींत अन्नधान्याच्या आयातीवर अवलंबून राहून अन्नधान्याच्या उत्पादनाच्या वाढीकडे दुर्लक्ष करणें योग्य होणार नाहीं. हिंदुस्थानांत अशा प्रकारचे प्रयत्न सरकारकडून होत असले तरी त्या प्रयत्नांचें प्रमाण अल्प असून शिवाय त्यांना प्रारंभही फार उशीरा झाला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अनेक संघटनांपैकीं अन्न व शेती संघटना ही फार महत्त्वाची असून तिनें पुढाकार घेऊन पूर्वेकडील देशांत शास्त्रीय सुधारणांच्या द्वारां अधिक उत्पादन करण्यावर ज्यास्त भर दिल्यास तें परिणामीं अधिक फलदायी ठरणार आहे.

अहवालांतील एका महत्त्वाच्या मुद्याचा परामर्ष घेतल्यानंतर १९४७ च्या अन्नधान्याच्या परिस्थितीविषयीं त्यांत काय विचार व्यक्त केले आहेत तें पाहूं. पूर्वेकडील देशांनी आंतरराष्ट्रीय अन्न–समितीकडे जितक्या तांदुळाची मागणी केली होती त्याच्या ⅓ सुद्धा तांदुळ मिळणें दुरापास्त दिसतें असा अभिप्राय व्यक्त करून पुढील वर्षाच्या जून पर्यंत तरी पूर्वेकडील देशांतील लोकांना १२ ते १४ टक्के कमी उष्णतामान देणाऱ्या अन्नधान्यांवरच संतुष्ट रहावें लागेल असा अंदाज करण्यांत आलेला

आहे. वर सांगितलेली घट युद्धपूर्व कालच्या तुलनेनें होणार आहे. हिंदुस्थानांत तांदुळाचा तुटवडा पुढील वर्षभर असाच चालणार असेंही अहवालांत म्हटलेलें आहे. जागतिक अन्नधान्याच्या तुटवड्याची कारणें देतांना मुख्यतः दोन कारणें नमूद करण्यांत आलीं आहेत. अमेरिकेंतील शिलकी अन्नधान्य, पिकणाऱ्या ठिकाणाहून हलवून सांठा करण्याच्या जागीं आणणें व तेथून पुन्हा बंदरांपर्यंत नेऊन पोचविणें या बाबतींत फारच अनिश्चितता उत्पन्न झाली आहे. परवाच अमेरिकेंत कोळशाच्या कामगारांचा संप झाल्याबरोबर धान्याची रेल्वेची वहातुक धोक्यांत आली होती. म्हणजे पर्यायानें अमेरिकन राजकारणाच्या सुरळीतपणावर पूर्वेकडील देशांतील लोकांचे पोटाचा प्रश्न अवलंबून आहे. अमेरिकेंत रिपब्लिकन पक्षाची सरशी झालेली असल्यानें अमेरिकन कामगार वर्गाला संपावर जाऊनच आपले हक्क मिळवावे व राखावे लागतील असें दिसतें. दुसरें कारण अन्नधान्याच्या खरेदीसाठी लागणारा पैसा उभारण्याची अडचण. वास्तविक ही अडचण अमेरिकन सरकारला पडण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या देशांत जर सक्तीची अन्न–धान्य–वसुली होऊं शकते तर ती अमेरिकन सरकारला करतां येणार नाहीं असें थोडेंच आहे! पण अमेरिकन सरकारला अशी सक्ती करावयाची झाली तर धान्याचा खुला बाजार बंद करणें भाग पडेल आणि अमेरिकेंत व्यक्तिस्वातंत्र्यवादी अर्थव्यवस्थेचा जो प्रचार आज धडाक्यानें चालू आहे, तो लक्षांत घेतां सक्तीची धान्य वसुली अमेरिकन सरकार हातीं घेईल असें मानण्यास काडीचाही आधार नाहीं. अशा रीतीनें हिंदुस्थानसारख्या पूर्वेकडील देशांच्या अन्नधान्याचा प्रश्न अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्रांच्या मुठींत सामावलेला आहे. हिंदुस्थान सरकारचे उपाध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांनीं आपल्या वजनाचा या प्रसंगीं उपयोग करणें अत्यंत जरूर आहे.

## गोपाळराव पारखे औद्योगिक पारितोषिकें

मराठा चेम्बर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें, या संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य व पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि. चे मॅनेजिंग एजंट श्री. म. स. पारखे यांनी त्यांचे धाकटे बंधु व धंद्यांतील सहकारी कै. श्री. गोपाळ सदाशिव पारखे यांच्या स्मरणार्थ औद्योगिक पारितोषिकें देण्याकरितां कायम निधि म्हणून रु. ६००० व पहिल्या बक्षिस योजनेकरितां रु. ६०० चेम्बरच्या स्वाधीन केले. त्याप्रमाणें चेम्बरच्या कार्यकारी मंडळानें प्रथम पारितोषिकाची योजना आखली. सदर पारितोषिक महाराष्ट्राच्या औद्योगिक उन्नतीला सहायभूत कार्य करण्याच्या उद्दिष्टानें पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, अहमदनगर, नाशिक, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, सोलापूर, पुणें, सातारा, बेळगांव व महाराष्ट्रांतील मराठी संस्थानें या भागांत १९४० पासुन तत्पूर्वी न होणारी वस्तु तयार करून बाजारपेठेंत ती यशस्वी रीतीनें खपविणाऱ्या कारखान्यांना देण्यांत यावें असें ठरविण्यांत आलें.

समितीनें चढाओढीसाठी आलेल्या २१ अर्जांचा विचार करून परीक्षक समितीनें ( समितीच्या सभेस श्री. ज. स. कांदीकर, श्री. शं. वा. किर्लोस्कर, श्री. दा. वा. पोतदार व श्री. म. स. पारखे हे सभासद उपस्थित होते ) पुढीलप्रमाणें आपला निर्णय जाहीर केला आहे व पुढील अनुक्रमानें बक्षिसें देण्याचें ठरविलें आहे:—

गट पहिला......छोटे व घरगुती कारखाने.

| क्र. | वस्तु | कारखान्याचें नांव | | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मे. रिंग टेप | मे. मॉडर्न क्लॉथ प्रिंटरी अँड इंडस्ट्रीज, पुणें. | रु. | १५० |
| २. | मोडिकॉन सेटस | मे. रामकला, पुणें. | रु. | १२५ |

गट दुसरा......मोठ्या प्रमाणावरील कारखाने.

| क्र. | वस्तु | कारखान्याचें नांव | | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | रबरी खेळणी व फुगे | मे. स्वस्तिक रबर मॉल्डर्स, पुणें | रु. | १२५ |
| २. | सिल्व्हीकल्चर भांडी | मे. देवल भांडी, पुणें. | रु. | १०० |
| ३. | इंडेक्स फाईल क्लिप्स | मे. उद्यम मंडळ, पुणें. | रु. | १०० |

सदर पारितोषिकें व प्रशस्तीपत्रें कै. गो. स. पारखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि. १६ जून १९४७ या दिवशीं देण्यांत येतील.

# स्फुट विचार

## कापड टंचाईवर उपाययोजना

टेक्स्टाइल कंट्रोल बोर्डाच्या, इंडस्ट्रीज कमिटीची एक सभा दिनांक २०।२१ डिसेंबर रोजीं नव्या दिल्लीस भरून तींत देशांतील कापड टंचाईचा विचार करण्यांत आला. लढाई संपून वर्ष, सव्वा वर्ष होऊन गेलें तरी अजून देशांतील कापडाची टंचाई कमी झालेली नाहीं. पुरेशा कच्च्या मालाचा अभाव, गिरण्यांना लागणारी सामुग्री ( मिल स्टोअर्स ) व जळण यांचें दुर्भिक्ष व कामगारांचा अपुरा पुरवठा यामुळें कापडाचें उत्पादन वाढण्यांत अडथळे येत आहेत. कामाचे तास कमी केल्याकारणानेंहि उत्पादन घटलें आहे. यावर उपाय म्हणून तीन पाळ्या सुरू कराव्यात अशी सूचना पुढें आली आहे. ज्या गिरण्यांमध्यें सध्यां फक्त रात्रपाळी व दिवसपाळी अशा दोनच पाळ्या चालू आहेत तेथें आठ आठ तासाची एक अशा तीन पाळ्या चालू करावयाच्या व ज्या गिरण्यांमध्यें सध्यां फक्त एकच पाळी चालू आहे तेथें रात्रपाळीहि चालू करावयाची अशी ही नवी योजना आहे. परंतु कापूस पुरेसा व योग्य भावांत मिळण्यावर या योजनेचें यश अवलंबून आहे. गिरण्यांच्या यंत्रसामुग्रीची टंचाई दूर करण्याच्या उद्देशानें इंग्लंडमधील यंत्रसामुग्रीच्या उत्पादकांची प्रसिद्ध गटसंस्था ( कम्बाइन ) टेक्सटाइल मशिनरी मॅन्युफॅक्चरिंग कंपनी हिच्या सहकार्यानें सुमारें दीड कोटी रुपये भांडवलाची एक कापड गिरण्यांची यंत्रसामुग्री उत्पादन करणारी कंपनी काढण्याचाहि विचार असून गिरणी मालकांनीं कापड उत्पादन वाढविण्याच्या सर्व योजनांत सरकारला पूर्ण सहकार्य देण्याचें आश्वासन दिलें आहे.

## सर श्रीराम ह्यांचें निवेदन

कापड टंचाईचीं वरील कारणें खरीं असलीं व टंचाईवरील उपाययोजना त्यांवर आधारलेली असली, तरी सर श्रीराम ह्यांच्या मतें खरी परिस्थिति वेगळीच आहे आणि ती गिरणीवाले व सरकार ह्या दोघांसहि ठाऊक आहे. धान्याच्या लागवडीस प्रोत्साहन देण्याच्या भरांत सरकारनें आखूड व मध्यम लांबीच्या धाग्याच्या कपाशीची लागवड मर्यादित केली, त्याचा कापडाचे उत्पादनावर होणारा परिणाम काय होईल ह्याकडे लक्ष दिलें गेलें नाहीं. ह्या कपाशीपासूनच जास्त कापडाचें उत्पादन मिळूं शकतें, हें सुप्रसिद्ध असतांहि त्या कपाशीची लागवड कमी करण्यांत आली, इतकेंच नव्हे तर त्या कपाशीच्या निर्गतीस परवानगी देण्यांत आली. गेल्या पंधरा महिन्यांत, आखूड व मध्यम लांबीच्या धाग्याच्या कपाशीची किंमत खंडीस २२० रुपयांवरून ४०० रुपये व ३६० रुपयांवरून ५०० रुपये अशी वाढली आहे. गिरणीवाले तलम कापडांत नफा जास्त मिळतो ह्यासाठी तें कापड अधिक प्रमाणांत काढण्यांत गुंतले आहेत आणि ज्या प्रमाणांत जाड्या भरड्या कापडाची जागा तलम कापड घेईल त्या प्रमाणांत एकूण उत्पादन घटतें, असा नेहमीचा हिशेब आहे. वेगळ्या वेगळ्या नंबरांच्या सुतासाठी योग्य किंमती ठरवून दिल्या व त्यांत खालच्या नंबरांच्या सुतास प्राधान्य दिलें तर तलम कापडाकडील कल कमी होईल असें सर श्रीराम ह्यांचें म्हणणें आहे. कपाशीचा तुटवडा नाहींसा करण्याचें अगत्यहि त्यांनीं प्रतिपादन केलें आहे.

## हिंदी उद्योगधंद्यांस संरक्षण

टारिफ बोर्डाकडे सोपविण्यांत आलेल्या संरक्षणाबाबत चौकशांपैकीं पांच चौकशांच्या रिपोर्टांवर हिंदुस्थान सरकारनें आपले निर्णय प्रसिद्ध केले आहेत. त्यांत कॅल्शिअम क्लोराइड, फोटो केमिकल्स, बायक्रोमेटस, फॉस्फेट्स व फॉस्फॉरिक ॲसिड आणि बटर कलर ह्या धंद्यांचा समावेश होतो. टारिफ बोर्डानें संरक्षणाबाबत चौकशी करतेवेळीं एक विशिष्ट तत्त्व आपले समोर ठेवलें होतें. संरक्षणाच्या दीर्घकालीन योजनेचा तूर्त विचार करावयाचा नाहीं, त्यासाठी धंद्याची परिपूर्ण व कसून चौकशी करावी लागेल व त्याला वेळ लागेल. धंद्याला प्रतिकूल व ज्या दूर करतां येणार नाहींत अशा मूलग्राही आर्थिक अडचणी नसतील, तर तो वर सांगितल्याप्रमाणें तातडीची चौकशी होऊन निर्णत ठेवण्यांत आला पाहिजे, ह्या तत्त्वाचें आधारावरच टारिफ बोर्डानें आपल्या तातडीच्या चौकशीचें काम पुरें केलें.

# दान-धर्म विश्वस्त-निधि मंडळ

( Religio-Charitable Trusts Corporation )

## देवस्थान मिळकतींच्या संरक्षणाची व संयोजनाची अभिनव योजना.

( लेखकः—श्री. स. वा. दातार, बी. एससी., एलएल. बी. )

### प्रास्ताविक

गांवोगांव व मोठमोठ्या शहरांत ठिकठिकाणीं लहानमोठ्या अनेक मिळकती देवस्थानांना वा दानदातृत्वासाठी समर्पित केलेल्या आढळतात. या मिळकतींची संकलित मोजणी केली तर ती अफाट भरेल. परंतु या मिळकतींपैकी अनेकांची व्यवस्था धड नाहीं तर अनेकांचें पुरें संरक्षणहि होत नाहीं. या उलट कित्येक अशा आहेत कीं त्यांच्याजवळ मुबलक साधनसंपत्ति असून त्यांचा पूर्ण फायदा समाजाला व्हावयास भरपूर वाव आहे, यासाठी उपेक्षित देवस्थानें व सुसंपन्न देवस्थानें यांच्या व्यवस्थेचें संयोजन करतां येईल तर आपल्या सर्वच धर्मनिधींचा कारभार हितावह होऊं शकेल.

### उपेक्षित देवळेंरावळें

देवस्थानांचे मूळ संस्थापक निघून गेले कीं त्यांच्या मागें त्यांच्या देवस्थानांची व्यवस्था पाहण्याची जोखीम आळेवळें कोणीतरी पंचाच्या हातीं द्यावी लागते. पुष्कळ वेळां वैयक्तिक लोभामुळें ही जोखीम माणसें पत्करतात. या कामाची त्यांना कांहीं स्वयंस्फूर्त आवड असते असें नाहीं. शिवाय आपआपले कामधंदे संभाळून शक्य तितक्या कमी वेळांत शक्य तितकें अधिक काम व्हावें अशी त्यांची अपेक्षा असते. त्यामुळें मानमरातबाच्या अथवा सुखसोयींच्या दृष्टीनें हितावह नसलेल्या देवस्थानांना पंच मिळण्याची सुद्धां कित्येक वेळां अडचण भासते. पुष्कळ वेळां एकादा हौशी व उत्साही भक्त आपल्या वैयक्तिक प्रभावाच्या जोरावर मोठा व्याप उभारतो. त्याच्या हयातींत त्याच्या कामाला खूप तेजी असते. त्यानें उभारलेल्या इमारतींचा भरपूर उपयोग होत असतो. परंतु एकदां तो निघून गेला कीं त्याचा सगळा मांड विस्कळून व उधळून जातो व त्यानें पैदा केलेली स्थावर जंगम मिळकत निरुपयोगी होऊन जाते. अशा अनेक साधु महात्म्यांचे मोठे मोठे मठ जागोजाग विखुरलेले आढळून येतात. कित्येक प्रापंचिक लोकांनीं सुद्धां आपल्या उपासनेसाठी घरोघर लहानमोठीं देवळेंरावळें उभीं केलेलीं असतात नि आपल्या मिळकतींपैकी कांहीं अंश भाग उत्पन्न त्यांना नेमून दिलेलें असतें. या उपासकांच्या पुढील वंशजांना या देवळारावळांची एक प्रकारें अडचणच भासते. पुष्कळ वेळां कांहीं उत्सव समारंभ अथवा अन्य कार्यक्रम कांहीं काल लोकप्रिय झालेले असतात. त्यासाठी मोठमोठे फंड उभारून मुबलक स्थावर मिळकती संपादन करून त्यावर त्या विशिष्ट प्रसंगांना उपयोगी अशीं बांधकामेंहि करून ठेवलीं जातात, परंतु नंतर पुढें हे उत्सव समारंभ बंद पडतात. लोकाभिरुचीचा ओघ दुसरीकडे वळतो आणि मग या मिळकती तशाच निरुपयोगी होऊन पडून राहतात.

### आक्रमणाचें संकट

या उपेक्षित देवळारावळांच्या मिळकतींचा अपहार व दुरुपयोग होण्याचा धोका नित्य असतो. सहसा या देवळारावळांमध्यें फारसा कोणाचा वावर नसतो; तेथील देवतांची पूजा अर्चा होत नाहीं आणि त्यांच्यांतील केरकचरा कोणी काढीत नाहीं. त्यामुळें गलिच्छपणा, अनाचार, अंधारें जीवन यासाठी या मिळकती वापरल्या जातात. याशिवाय सर्वांत मोठी आपत्ति म्हणजे ही आपली उपेक्षा केली गेलेली संपत्ति आक्रमक परधर्मी लोक डावपेंच करून खुशाल गिळून टाकतात. आपल्या धर्माचे लोक या मिळकतींसंबंधीं कितीहि अनास्थेनें वागले तरी ती अजिबात गिळंकृत करण्याचा धीर त्यांना होत नाहीं. परंतु आपल्या कांहीं शेजाऱ्यांचे गुणधर्मच असे आहेत कीं दुसऱ्याचा नायनाट करणें, त्यांच्या संपत्तीचा अपहार करणें नि आपली पोतडी भरणें हीच व्यवहारतः त्यांना पुण्य कृत्यें वाटतात. अशा दुरुपयोगापासून व आक्रमणासून या उपेक्षित संपत्तीचें संरक्षण होणें साहाजिकच समाजाच्या हिताचें आहे.

### सुसंपन्न देवस्थानें

या उलट आपल्या समाजाच्या व धर्माच्या मालकीचीं अशींहि कित्येक देवस्थानें आहेत कीं ज्यांना मोठमोठ्या नेमणुका, वर्षासनें व उत्पादनक्षम मिळकती तोडून दिलेल्या आहेत. यांपैकी कांहीं खाजगी आहेत तर बरीचशीं ग्रामपंचांच्या अथवा अन्य विश्वस्तांच्या ताब्यांत आहेत. पुष्कळ ठिकाणीं या विश्वस्तांच्या नेमणुका सरकारमार्फत जिल्हा कोर्टाकडून केल्या जातात व अशा विश्वस्त संस्थांच्या कारभाराचे वृत्तांत जिल्हा कोर्टाच्या परीक्षणासाठी सादर केले जातात. या देवस्थानांमध्यें अनुषंगिक अशींहि अनेक प्रकारची साधनसामुग्री गोळा झालेली असते व कांहीं उपयुक्त सोयीहि मोठ्या प्रमाणावर केलेल्या असतात. अशीं पुष्कळ देवस्थानें प्रमुख व प्रसिद्ध असल्यामुळें त्यांचा भक्तगणहि मोठा असतो त्यामुळें नव्यानें येणाऱ्या संपत्तीचाही मोठा झरा त्यांच्या तिजोरींत खुळखुळत असतो. अशा देवस्थानांना कारभारी पंचमंडळींची सहसा वाण पडत नाहीं पण विश्वस्ताची जागा म्हणजे मानमरातब व कांहीं सवलती लाभण्याची एक खात्रीची संधि यापलीकडे दृष्टि देणारे विश्वस्त विरळाच लाभतात.

### उपलब्ध साधनांचा संघटित व सुसंगत उपयोग

या सर्व साधनसंपत्तीचें संकलन ( पूलींग ऑफ द रिसोर्सेस् ) करून योजनापूर्वक संघटित पद्धतीनें तिचा सुसंगत उपयोग ( को-ऑर्डिनेशन ) करतां येणें शक्य आहे. प्रत्येक जिल्ह्यांतील लहानमोठ्या सर्व देवस्थानांची व त्यांच्या मिळकतींची यादी तयार करावयाची; कोणत्या संस्थेंत वा देवालयांत काय जादा सोयी वा साधनें उपलब्ध आहेत त्यांचीहि तपशिलवार जंत्री तयार करावयाची व या साधनसामुग्रीचा उपयोग करून शक्य तितक्या अधिक मिळकतींची व्यवस्था राखावयाची. उदाहरणार्थ, पुष्कळ देवस्थानांत विशिष्ट महत्त्वाच्या धार्मिक दिवशीं रोख दक्षणा वाटली जाते, कांहीं ठिकाणीं नियमित संख्येपर्यंत भक्तगणांच्या जेवणाची सोय असते. तर कित्येक ठिकाणीं वार्षिक वस्त्रदान केलें जातें. अशा सर्व साधनसंपत्तीचें संकलन व नियोजन करून सभोंवतालच्या उपेक्षित देवळारावळांची झाडलोट व पूजाअर्चा करणारीं माणसें सहज कामावर लावतां येतील, साधनसामुग्रीचा तपशील पाहून विभागवार आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी गट तयार करून स्थानिक मंडळींच्या सहाय्यानें एकादी मध्यवर्ती संस्था या कामाचें नियोजन करावयास निश्चितपणें समर्थ होऊं शकेल.

### विश्वस्त संस्थेची घटना

ही संस्था ' बँक ऑफ महाराष्ट्र ' नें काढलेल्या ' एक्झिक्यूटर अँन्ड ट्रस्टी कंपनी ' सारख्या अथवा ' कोर्ट ऑफ वॉर्डस ' सारख्या स्वरूपाची असून ' इंडियन कंपनीज ॲक्ट ' च्या २६ व्या कलमाखालीं ' ॲन असोसिएशन नॉट फॉर प्रॉफिट ' म्हणून फायदा मिळविण्यासाठी काढली नसलेली व आपल्या सभासदांना फायदा वाटीत नसलेली सार्वजनिक संस्था या अर्थानें नोंदतां येईल. संस्था अशाप्रकारें नोंदली असली म्हणजे तिच्या कार्यास कायदेशीरपणा, स्थैर्य व सुरक्षितता प्राप्त होईल व तिचे कारभारावर उपयुक्त नियंत्रणें ठेवलीं जातील.

### सभासदत्व

संस्थेच्या सभासदांचे मुख्यतः तीन प्रकार रहातील ( १ ) विश्वस्त देवस्थानें ( २ ) देवस्थान सभासद व ( ३ ) पंच सभासद. पैकीं ( १ ) विश्वस्त देवस्थानें हा वर्ग ज्या देवस्थानांचा कारभार प्रामुख्यानें सदर संस्थेच्या ताब्यांत दिला असेल त्या देवस्थानांचा होय. अशा देवस्थानाचा कारभार पाहण्यासाठी संस्था आपला प्रतिनिधि म्हणून एक जबाबदार

गृहस्थ आपल्या पंचसमासदांतून नेमील व दुसरे कांहीं संस्थेचे पंच समासद त्याअला मदत करण्यासाठी व्यवस्था समितीचे पंच म्हणून नेमील. या पंचायतींकडून सर्व कारभार पाहिला जाईल आणि त्यासाठी सदर देवस्थानाच्या उत्पन्नांतून कोर्ट ऑफ वार्ड घेतें त्याप्रमाणेंच एकूण उत्पन्नाचा कांहीं अंशभाग विश्वस्त संस्थेकडून घेतला जाईल. व्यवस्थेसाठीं लागणारा इतर सर्व खर्च देवस्थानच्या उत्पन्नांतून केला जाईल. ( २ ) दुसरा वर्ग— देवस्थान समासदांचा. ज्या देवस्थानांना या योजनेंत भाग घ्यावयाचा असेल परंतु ज्यांची व्यवस्था स्वतंत्र वा खासगी मालकाकडे आहे अशा देवस्थानांच्या मिळकतींच्या प्रमाणांत अशा समासदांकडून संस्थेची वर्गणी घेतली जाईल व मुख्यतः साधनसामुग्रींचें संकलन करण्याचे कामीं या देवस्थान समासदांचा उपयोग होईल. ( ३ ) तिसरा वर्ग पंच समासदांचा. कोणतीहि संस्था व्यक्तींच्या हातानेंच कार्यशील असते. यास्तव या संस्थेचें कार्य पार पाडण्यासाठीं जे प्रतिष्ठित नागरिक तयार असतील त्यांचा समावेश पंच सभासदांत केला जाईल. या मंडळींतूनच निरनिराळ्या देवस्थानांचे सहाय्यकारी पंच नेमले जावे व नेमल्या गेलेल्या पंचांनीं या संस्थेचे सभासद व्हावें अशी अपेक्षा राहील. या सभासदांकडून संस्थेच्या कार्यासाठीं माफक वार्षिक वर्गणी घेतली जावी. याशिवाय संस्थेनें देणग्या स्वीकारावयास सुद्धां हरकत नसावी.

## उत्पन्न व त्याचा विनियोग

वरील स्वरूपाच्या घटनेमुळें संस्थेला तीन मार्गांनीं उत्पन्न येत राहील ( १ ) विश्वस्त देवस्थानांच्या उत्पन्नांतून व्यवस्था राखण्याबद्दलचा मोबदला ( २ ) देवस्थान समासदांची वर्गणी व ( ३ ) पंच समासदांची वर्गणी. चवथा मार्ग देणग्यांचा आहे पण तो निश्चित स्वरूपाचा नाहीं. या उत्पन्नाचा विनियोग संस्थेनें पुढीलप्रमाणें करावा. एकूण उत्पन्नापैकी चतुर्थ भाग संस्थेच्या कार्यकर्त्यांना वेतन देण्याकडे; चतुर्थ भाग संस्थेला लागणारी साधनसामुग्री खरीदण्याकडे आणि द्वितीय भाग उपेक्षित देवस्थानांच्या संरक्षणाकडे खर्च करावा. कांहीं किमान उत्पन्न केवळ संस्थेच्या कार्यकारी मंडळींना वेतन देण्यासाठी राखून ठेवण्यासहि हरकत नाहीं.

## निरुपद्रवी धोरण

या संस्थेचें मुख्य कर्तव्य आपल्या देवस्थानांची व त्यांच्या धनदौलतीची व्यवस्था व निगा राखून तिचें संरक्षण करणें एवढेंच समजण्यांत येईल. देवस्थानें स्थापन करणाऱ्यांच्या मूलभूत हेतूंना व अभिप्रायांना कोणत्याहि प्रकारें बाध वा धोका आणण्याचे प्रयत्न संस्था करणार नाहीं. त्याचप्रमाणें समाजाच्या प्रगतीला विरोध होईल अशा रीतीनेंहि या साधनांचा उपयोग केला जाणार नाहीं. देशांत विद्यमान असतील त्या कायद्यांचें कसोशीनें परिपालन करून संस्था प्रस्थापकांचे हेतू व आज्ञा आणि समाजाचें हित यांची सांगड नित्य घालीत राहील. उदाहरणार्थ, एकादें संपन्न देवस्थान केवळ गवळी लोकांसाठीच स्थापन झालेलें असेल तर संस्था त्यांतील जादा साधनसामुग्री व सोयी गवळी लोकांच्या हितासाठींच वापरील, इतर जवळपासच्या उपेक्षित गवळी देवस्थानांचा कारभार या देवस्थानाच्या सहाय्यानें हातीं घेईल व ज्या रीतीनें शक्य होईल त्या रीतीनें या व्यवस्थेची सांगड संस्थेच्या सर्वव्यापी कार्यांशीं जोडून घेईल. पुष्कळ देवस्थानांचे पंच एकाद्या विशिष्ट जातीचेच असावेत अशीं मूळ संस्थापकांनीं अट घातलेली असते वा तशी प्रथा असते. संस्था तिला विरोध करणार नाहीं. तर अशा जातीय पंचांनाच आपले पंच–सभासद करून घेऊन त्यांच्या मार्फत आपलें कार्य चालवील. अशीं अनेक देवस्थानें आहेत कीं जीं संपूर्णतः किंवा अंशतः खासगी मालकीचीं आहेत, व त्यांची वहिवाट व्यवस्था खासगी माणसांकडेच असते. संस्था अशा देवस्थानांच्या खासगी मालकीस वा खासगी व्यवस्थेस विरोधी असणार नाहीं. देवस्थान समासद म्हणून त्यांचा समावेश संस्थेच्या कार्यांत होईल. अशा देवस्थानांचीं समागृहें, धर्मशाळा संस्थेच्या कार्यास शक्य तेव्हां वापरावयास घेतलीं जातील, त्यांच्याजवळ ज्या जादा सोयी असतील त्यांचा उपयोगहि संस्थेच्या कार्याकडे करून घेतला जाईल. अशा प्रकारें कोणाच्याहि प्रस्थापित हितसंबंधास यत्किंचितहि धोका वा बाध न आणतां निरुपद्रवीपणानें पण समाजाच्या सार्वत्रिक हितास अनुलक्षून सर्वसंग्राहक व सर्वसंयोजक दृष्टीनें आणि विश्वस्त भावनेनें ही संस्था चालविली जाईल.

## नव्या दातृत्वास मार्गदर्शन

प्रांतोप्रांतींच्या सर्व धर्मसंस्थांची जंत्री राखण्याचा प्रयत्न ठेवण्यांत यावयाचा असल्याकारणानें कोठें कसली उणीव आहे ही गोष्ट या व्यवस्थेमुळें सहज कळूं शकेल. अशा उणीवांचा विचार करून समाजांतील नव्या दातृत्वास योग्य ती दिशाही लावण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. त्यामुळें आज फुटकळ व विस्कळित दातृत्वामुळें पुष्कळशी समाजाची धनसंपदा निरुपयोगी होत आहे ती सुसंगत व संघटित मार्गदर्शनामुळें समाजाची महत्त्वाची गरज भागविण्यास अधिकाधिक पात्र होत जाईल.

## धार्मिक सोयींचें समाअीकरण

अशाप्रकारें काम करणारी संस्था निर्माण झाल्यामुळें समाजाच्या लहानथोर सर्व घटकावयवांना उपयोगी पडेल अशा प्रकारची धार्मिक ज्ञानदानाची, धार्मिक साधना चालविण्याची व धार्मिक आदर्शांचीं प्रात्यक्षिकें समजापुढें ठेवण्याची समाजवादी सोय होऊं शकेल. आपल्या धर्ममंदिरांना आल्हादक व उपकारी स्वरूप देण्यास संधि मिळेल आणि अपेक्षा असेल त्या कोणत्याहि थरांतील कोणाहि आपल्या धर्मबांधवास धर्माचरण करण्यास मदत मिळूं शकेल.

## स्वावलंबी धर्मखातें

आपला धर्म राजकारणी स्वरूपाचा प्रथमपासूनच नाहीं आणि आधुनिक काळांत तर राजकरणाचा संपर्कही धर्मास होणें इष्ट नाहीं. उपासना स्वातंत्र्य म्हणजेच धर्मस्वातंत्र्य. व्यक्ती व्यक्तीला अनिर्बंधपणें परंतु दुसऱ्या व्यक्तींच्या अशाच स्वरूपाच्या स्वातंत्र्यास विरोध न होईल अशा रीतीनें उपभोगावयाचा हक्क राजकारणी लोकांनीं मुक्तहस्तानें दिला कीं धर्मप्रेमी जनतेस दुसरी अपेक्षा नाहीं. प्रस्थापित सरकारनें कोणत्याहि धर्मास सरकारचा धर्म म्हणून मान्यता देणें या काळांत उचित नाहीं. अशा परिस्थितींत श्रद्धावन्तांना ही संस्था स्वावलंबी धर्मखातें म्हणून उपयोगी होऊं शकेल. इष्ट तर याच योजनेनें कोणत्याहि इतर धर्मांच्या मिळकतींची सुद्धां व्यवस्था ठेवणें सुलभ होईल.

## विश्वस्तांची भूमिका व कर्तव्यमर्यादा

संस्थेची घटना विधि प्रतिष्ठित असल्यामुळें तिच्या धार्मिक कार्यांचा व परिस्थितीचा आढावा वेळोवेळीं घेणें शक्य होईल. संस्थेच्या संलग्नित धर्मस्थानांचे संकलित, अहवाल प्रसिद्ध होऊं शकतील व अशा रीतीनें देशाच्या एकंदर सर्वच धार्मिक धनदौलतीच्या कारभारावर लोकमताची व कायद्याची छाप बसवता येईल. संस्थेचा असा कारभार चालवितांना प्रचलित कायद्याप्रमाणें विश्वस्तांचे ( ट्रस्टींचे ) जे अधिकार व जीं कर्तव्यें असतात आणि ज्या मर्यादा त्यांना पाळाव्या लागतात त्यांचें कसोशीनें परिपालन केलें जाईल. विश्वस्तांना अथवा निधिधारकांना मूळ प्रस्थापकाचे किंवा देणगीदाराचे हेतू पुरे करावयाचे असतात, आणि ज्या ठिकाणीं स्पष्ट मार्गदर्शन नसेल त्या ठिकाणीं त्या हेतूंशीं सुसंगत व अविरोधी अशा पद्धतीनें सदर निधीचा विनियोग करावयाचा असतो. या व्यवस्थेपासून स्वतःला अलिप्त व त्रयस्थ समजावयाचें व राखावयाचें असतें आणि सर्व व्यवहार प्रगट व चोख ठेवावयाचे असतात. या सर्व कार्यकक्षा या योजनेंत प्रामाणिकपणें पाळल्या जातील. स्वामी विवेकानंदांनीं स्थापन केलेल्या रामकृष्ण मिशनचे मठ जगभर सर्व ठिकाणीं आहेत. त्यांची व्यवस्था तत्त्वतः याच स्वरूपांत ठेवली जाते. या संस्थेच्या योगानें तीच योजना सार्वत्रिक स्वरूपांत प्रांतोप्रांतीं विभागाविभागांत व संग्राहक व्यापक धोरणानें शक्य तोंवर एकाच संस्थेमार्फत वा अपरिहार्य असेल तर अनेक याच स्वरूपाच्या स्थानिक संस्था स्थापून सर्व धर्मसंस्थांच्या कारभारासाठी उपयोजिली जाणें अत्यंत हिताचें होईल.

## विनंती

श्रद्धावन्त धर्मप्रेमी मंडळींनीं या योजनेचा आस्थापूर्वक विचार करावा आणि अशा स्वरूपाची संस्था निर्माण करण्यास सहाय्यभूत व्हावें अशी आग्रहाची विनंति आहे,

## किर्लोस्कर बंधु लि. ची वार्षिक सभा

### चेअरमन, श्री. सरदार जगन्नाथ महाराज पंडित ह्यांचें भाषण

किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी यांच्या भागीदारांच्या २६ व्या वार्षिक साधारण सभेच्या वेळीं कंपनीचे चेअरमन श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित यांनीं खालील प्रमाणें भाषण केलें:—

### अडचणींचें निवारण

" महायुद्धामुळें जगाची सारी आर्थिक व राजकीय घडी विसकून सर्वत्र अशांतता निर्माण झाली आहे व औद्योगिक क्षेत्रांत मोठाच आणीबाणीचा प्रसंग उद्भवला आहे. आपल्या कारखान्यास लागणाऱ्या कोक, लोखंड, पोलाद इ. कच्च्या मालाची दुर्भिळता, वहातुकीच्या अडचणी, देशांतील जातीय दंग्याचें वातावरण, संप, कामाचे कमी केलेले तास इत्यादींचा आपल्या कारखान्यावर अनिष्ट परिणाम घडून येत आहे. यंदाच्या हंगामांत आपल्या ग्राहकांना हजारो नांगर व चरक आपणांस पुरवावयाचे आहेत. परंतु ही मागणी आपणांस कशी पूर्ण करितां येईल याबद्दल विवंचना निर्माण झाली आहे. कंपनीचे चालक कच्चा माल मिळविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असून, हातीं असलेल्या कच्च्या मालापासून शक्य तेवढा पक्का माल निर्माण करण्याचें कार्य सुरू आहेच. सुदैवानें आपल्या देशांत राष्ट्रीय सरकार स्थापन झालें असून त्या सरकारचें धोरणहि हिन्दी उद्योगधंद्यांची वाढ व प्रगति करण्याचें आहे व त्यामुळें हिन्दी कारखानदारांच्या अडचणी निवारण करण्यासाठीं जरूर त्या योजना त्यांचेकडून अमलांत आणल्या जातील अशी अपेक्षा आहे.

### कामगारांच्याबाबत प्रगतिप्रिय धोरण

" तथापि कारखान्याची प्रगति व चिरस्थायीपणा हा केवळ चालकांच्या प्रयत्नावरच अवलंबून नसून तो कामगारांच्या परिश्रमावरहि अवलंबून आहे व त्यासाठी कामगारांनी आपलें कर्तव्य ओळखून त्याप्रमाणें आपलें धोरण आखलें पाहिजे. आपली कंपनी, कारखान्याचे ग्राहक, भागीदार व कामगार वर्ग यांचे हिताबद्दल तत्पर असून याबाबतचें तिचें धोरण सुरवातीपासूनच सहानुभूतीचें व विचारशीलतेचें आहे. कंपनीनें कामगारांच्या युनियनला सुरवातीपासूनच मान्यता दिली असून त्यांच्या कामकाजासाठी यंदा एक ऑफिस इमारतहि बांधून देण्यांत आली आहे. श्री. मावळंकर यांच्या लवादनिर्णयाप्रमाणें मिळणारे सर्व फायदे व कंपनीने देऊ केलेला बोनस अशी सर्व रक्कम कामगारांना मिळणार असून यंदा सप्टेंबर महिन्यांत कंपनीने आपणहून कामगारांना पगारवाढ दिली आहे. यंदा कंपनीची बोनस देण्याची पद्धति सर्वत्र प्रचलित असून युनियनच्या सेक्रेटरींनींहि त्याला संमति दर्शविली आहे. शिवाय विधायक कार्य करण्यासाठी कंपनीने यूनियनला पांचशे रुपयांची देणगीही मंजूर केली आहे. यावरून असें दिसून येईल कीं, कामगारांच्या बाबतींत कंपनीचें धोरण उदार व प्रगतिपर आहे व कामगारांनींहि हें जाणून आपले सहकार्य कंपनीस द्यावें व ट्रेड यूनिअनच्या तत्त्वांस अनुसरून आपलें कार्य चालूं ठेवावें. कारखान्याच्या प्रगतीला व अस्तित्वाला जें कृत्य विघातक होईल तें कामगारांनाहि हानिकारक होतें हें नाकारतां येणार नाहीं. "

भाषणाच्या शेवटीं अध्यक्षांनी कामगार, स्टाफ मेम्बर्स व चालक यांचे आभार मानून गेल्या सालाप्रमाणे येत्या सालींहि ते उत्साहाने व एकोप्याने आपलें काम पार पाडतील अशी आशा व्यक्त करून आपलें भाषण संपविलें.

---

दि. कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर —वरील बँकेचें वसूल भांडवल १,००,०१० रु. असून रिझर्व्ह व इतर फंडांत ५०७५० रु. आहेत. ठेवींचा आकडा २९ लक्ष, २७ हजारांवर गेला आहे. ३०-६-४६ अखेर संपलेल्या वर्षीं बँकेचें खेळतें भांडवल १० लक्ष रुपयांनीं वाढलें. निव्वळ नफा ३७,८३६ रु. झाला. द. सा. द. शे. रु. ८८२ प्रमाणें करमाफ डिव्हिडंड व प्रत्येक शेअरला ३ आणे बोनस देण्यास ५,००० रु. लागतील. १६ हजार रु. रिझर्व्ह व इतर फंडांत टाकण्यांत येतील. इनकम टॅक्ससाठी १६,५०० रु. काढून ठेवले आहेत. अहवालाचे वर्षी बँकेनें आपला दशवार्षिक समारंभ थाटानें साजरा केला. श्री. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे हे बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.


# दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपिन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | : | २,९७,६७,१०० रु. |
| वसूल झालेलें भांडवल | : | १,४८,८३,५५० रु. |
| रिझर्व्ह फंड | : | १,८३,३३,५५० रु. |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग, मुंबई.

—शाखा—

अहमदाबाद
भद्र ( मुख्य ऑफिस )
एलिस ब्रिज
स्टेशन ब्रँच
माणेक चौक
अमृतसर
अंधेरी ( मुंबई शेजारीं )
वांद्रे ( मुंबई शेजारीं )
भुज ( कच्छ )
मुंबई
बुलियन एक्सचेंज
कुलाबा
काळबादेवी
मलबार हिल
कलकत्ता
क्लाईव्ह स्ट्रीट ( मुख्य ऑफिस )
बडा बझार
चौरंगी स्केअर

कोइमतूर
हैद्राबाद ( सिंध )
जमशेदपूर
जुनागड
कराची
मद्रास
नागपूर
किंग्जवे
इतवारी बझार
पालनपूर
पुणें
पुणें शहर
राजकोट
सुरत
सोलापूर
वेरावळ

लंडन शाखा : १७, मूर गेट, लंडन ई. सी. २

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

—डायरेक्टर्स—

सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., ( चेअरमन ); मि. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; मि. दिनशा के. दाजी; मि. रामनिवास रामनारायण; ना. सर शांतिदास आस्करण, नाइट; श्री. महंमद सुलेमान कासम मिठा.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

कांहीं ठिकाणें सोडून दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० पेक्षां अधिक शिलकेवरील व्याज फक्त खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं.

कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते आणि ट्रस्टीचें सर्वसाधारण काम स्वीकारते. अर्ज करून नियम मागवावेत.

सर्वसाधारण बँकिंगचा व्यवहार केला जातो.

एच्. ए. करीमभॉय
एजंट

## औद्योगिक कंपन्यांचा युद्धकालीन नफा

१९४०–४४ ह्या मुदतींत औद्योगिक कंपन्यांना झालेला नफा लक्ष्यांत घेतला, तर डिव्हिडंडचा दर बराच वाढलेला दिसतो. परंतु, रुपयाची किंमत पूर्वी १६ आणे असली तरी युद्धकाळांत ती ६ आणे सुद्धां उरली नाहीं, या हिशोबानें युद्धकाळांतील १०% डिव्हिडंड हें युद्धपूर्वीच्या ४% डिव्हिडंड इतकेंच भरेल. हिंदी औद्योगिक कंपन्यांनीं १९३९–४० ते १९४३–४४ ह्या पांच वर्षांत सरासरीनें ९·८% डिव्हिडंड दिलें आणि शेअर्सच्या बाजारभावाचा विचार केला तर तें ४·६%पडतें, अशी त्याची सर पद्मपाद सिंघानिया ह्यांनीं छाननी केली आहे. महागाईच्या प्रमाणांत कामगारांना जर वेतन मिळालें पाहिजे तर भागीदारांनाहि तसें वाढतें डिव्हिडंड कां मिळूं नये, अशी त्यांची विचारसरणी आहे. खालील तक्त्यांत कपास, ताग, इंजिनिअरिंग, कोळसा, साखर, बँका, रसायनें, कागद, सिमेंट व मळे ह्या धंद्यांच्या नफ्याचा तपशील दिला आहे त्यावरून शेअर्सच्या बाजारभावावर पडणारें डिव्हिडंड लक्ष्यांत घेतलें तर मळेवाल्यांना सर्वांत जास्त म्हणजे ६·६% डिव्हिडंड मिळालें असें दिसून येईल. कपास - कापडाच्या गिरण्यांचे शेअर्स फार तेजींत असल्याकारणानें त्यांचेवर फक्त ५% डिव्हिडंड सुटलें. बँकांच्या शेअर्सवर तर फक्त ३% डिव्हिडंड पडलें. कापड, ताग ह्या धंद्यांच्या कंपन्यांनीं चांगली गंगाजळी निर्माण केली आहे. रिझर्व्हचें वसूल भांडवलाशीं प्रमाण बँकांचे बाबतींत तर ६३% इतकें आहे.

### १९४०–४४ मधील औद्योगिक नफा

| उद्योग | कंपन्यांची संख्या | वसूल भांडवल (लक्ष रुपये) | ब्लॉक व भांडवलाशीं प्रमाण % | सरासरी नफा % | सरासरी डिव्हिडंड % | १०० रु. च्या ऑर्डिनरी शेअरची सरासरी किंमत | १०० रु.च्या ऑ.शेअरच्या बाजारभावावर पडणारें सरासरी डिव्हि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कपास | ९५ | २९·६७ | ९९ | २९·६ | १७·२ | ३४२ | ५·० |
| ताग | ६२ | २२·०२ | ७९ | १४·० | १५·७ | ३२० | ४·९ |
| इंजिनिअरिंग | ३४ | २६·१३ | १०१ | १९·० | ११·० | २३८ | ४·६ |
| कोळसा | ५३ | ५·६३ | ९९ | २१·० | ७·८ | २०० | ३·९ |
| साखर | ४७ | ८·९६ | ९४ | १३·८ | १०·० | २०३ | ५·० |
| बँका | २९ | १३·९८ | — | १३·६ | ८·६ | २६५ | ३·१ |
| रसायनें | १५ | ३·९२ | ६६ | ५·५ | ७·१ | २२२ | ३·२ |
| कागद | १० | ३·५१ | ७७ | २०·५ | १५·२ | २७९ | ५·४ |
| सिमेंट | ६ | १०·३४ | ६७ | ९·६ | ३·५ | १३० | २·७ |
| मळे | ५० | ५·०६ | ... | ... | १८·४ | २८०. | ६·६ |

## जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लिमिटेड भिवंडी जि. ठाणें

( मॅनेजिंग एजंट्सः मे. दांडेकर इंजिनिअर्स लि. )

या कारखान्याची १९४५ जून ३० रोजीं पुऱ्या झालेल्या सातव्या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा, भिवंडी येथें कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें दिनांक १५ डिसेंबर १९४६ रोजीं दुपारीं २ वाजतां भरली होती. अध्यक्षस्थानीं कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे चेअरमन श्री. व्ही. पी. वर्दे हे होते. सभेमध्यें बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा वार्षिक अहवाल त्याचप्रमाणें प्रत्येक प्रेफरन्स शेअरवर ५ टक्के व आर्डिनरी शेअरवर ६ टक्के याप्रमाणें डिव्हिडंड मंजूर झालें. या वर्षी डायरेक्टर बोर्डावरून निवृत्त होणारे सभासद शेट देवानंद जेठा राजा, कल्याण; शेट जयंतीलाल जीवराज मेहता, मुंबई; शेट चंपकलाल देवीदास मुंबई व श्री. श्रीनिवास माधव किनी, मुंबई यांची पुनः निवडणूक करण्यांत आली. कंपनीनें एकुण ५ लक्ष, ९१ हजार रुपयांची विक्री केली. कंपनीचें वसूल भांडवल ४ लक्ष, ९९ हजार रु. असून एकूण खेळतें भांडवल १० लक्ष, २२ हजार रु. आहे. त्यांतील ४ लक्ष, ९७ हजार रु. रोख्यांत गुंतविलेले आहेत. कंपनीचा घसारा फंड ७७ हजार रु. झाला आहे.

## " मोटार धंद्याचें राष्ट्रीयकरण इतक्या तांतडीनें होऊं नये. "

### डॉ. एन. एस. हर्डीकर ह्यांचे विचार

" मुंबईसरकार मोटार वहातुकीच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण करण्याच्या त्वरित विचारांत असल्याचें समजतें. त्यामुळें या प्रांतांतील मोटारमालकांमध्यें बरीच घबराट निर्माण झाली आहे. अशावेळीं आपण कांहीं मार्गदर्शन करूं शकाल काय ? " असा प्रश्न साऊथ डेक्कन मोटार काँग्रेसचे चिटणीस श्री. कुलकर्णी यांनी हुबळीचे डॉ. एन. एस. हर्डीकर यांना विचारला असतां, ते म्हणालेः "मुंबईचे गृहमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनीं त्यांना कांहीं दिवसांपूर्वीं भेटण्यास गेलेल्या मोटार काँग्रेसच्या शिष्टमंडळास असें आश्वासन दिलें होतें कीं रस्तावहातुकीचें राष्ट्रीयकरण अगर तत्सम कोठलीहि योजना जनतेपुढें मांडण्यात येऊन त्यावर पूर्ण चर्चा झाल्याशिवाय अमलांत आणली जाणार नाहीं. त्यामुळें मोटार मालकांनीं घाबरून जाण्याचें कारण नाहीं. सरकार इतक्या लवकर घिसाडघाई करणार नाहीं असें मला वाटतें. " ते पुढें म्हणाले, " ९३ कलमी सरकारनें आणलेल्या रेलरोड योजनेस आम्हीं विरोध केला हें खरें असलें तरी त्यावेळीं एक गोष्ट मात्र स्पष्ट केली होती कीं, लोकप्रातिनिधिक सरकारनें देशाच्या हिताच्या दृष्टीनें व जनतेच्या सुखसोयींच्या दृष्टीनें जर मोटार-धंद्यासंबंधीं एखादी योजना अमलांत आणण्याचें ठरविल्यास आम्ही त्यास विरोध करूं शकणार नाहीं. मी स्वतः मोटार-वहातुकीच्या राष्ट्रीय-करणाच्या विरुद्ध नाहीं; मात्र देशांतील सद्यःपरिस्थितीचा विचार करतां इतक्या तांतडीनें मोटार धंद्याचें राष्ट्रीयकरण करून या धंद्यांतील लोकांना हांकलून देऊं नये, असें माझें मत आहे. देशांतील परिस्थिति स्थिरावण्यास निदान पांच वर्षांचा अवधी पाहिजे. तोपर्यंत राष्ट्रीयकरणाची योजना अमलांत आणली जाऊं नये असें वाटतें. या सर्व परिस्थितीचा विचार करण्यासाठी व त्याबाबतींत आपलें म्हणणें सरकारकडे अधिकृतरीत्या मांडण्यासाठी प्रांतांतील मोटरमालकांची शक्य तितक्या लवकर एक परिषद् बोलवावी. "

यावेळीं मोटार मालकांनीं आपली संघटना करावी असें सांगून त्यांनीं असा इषारा दिला कीं, जनतेची सहानुभूति मिळविण्यासाठी त्यांना शक्य त्या सवलती देऊन त्यांचेशीं सौजन्यानें वागावें.

## औंध बँकेच्या विचूद शाखेवर दरोडा

( अधिकृत माहिती )

" बँक ऑफ औंध लि: च्या विचूद शाखेच्या इमारतीवर २० ते २५ गुंडांनीं ता. १९ च्या पहाटें १ ते ४ च्या दरम्यान हल्ला केला. त्यांनीं बँकेच्या पहारेकऱ्यावर चाल करून त्यास दगड मारला, त्यानें तो थोडासा जखमी झाला व पळाला. दरोडेखोरांनीं नंतर पुढच्या दरवाजाचें कुलूप अर्धा तास प्रयत्न करून फोडलें. आंतील तीन आणखी कुलुपें फोडून त्यांनीं तळांतील स्ट्रॉंग रूममध्यें प्रवेश केला. तेथें सेफ व बँकेकडे गहाण ठेवण्यांत आलेलें सोनें आणि चीजवस्तु असलेलें पोलादी कपाट होतें. " गोद्रेज " सेफ फोडण्याचा त्यांनीं प्रयत्न केला परंतु आपल्या लौकिकाप्रमाणें तो अभेद्य राहिला. तीन तासांच्या मेहेनतीनंतर पोलादी कॅबिनेट उघडण्यांत त्यांस यश आलें. त्यांतील सर्व थैल्या त्यांनीं पळविल्या. आजच्या बाजारभावानें हिशेब केल्यास नुकसानीचा आकडा सुमारें ३५,००० रुपये भरेल.

" जेथें बँकेची कचेरी किंवा संस्थानची तिजोरी आहे, अशा सर्व ठिकाणीं पोलिस बंदोबस्त वाढविण्याची औंध सरकारनें दक्षता घेतली आहे. गुन्हेगाराचा तपास करून लुटलेला माल परत मिळविण्याची कोशिस चालू आहे. "

## महाराष्ट्र रोजनिशी व दिनदर्शिका

दरवर्षीप्रमाणें, पुणें अनाथ विद्यार्थी गृहानें महाराष्ट्र रोजनिशी व दिनदर्शिका प्रसिद्ध केली आहे. हुषार व गरीब विद्यार्थ्यांचें पालनपोषण व शिक्षण करणाऱ्या ह्या संस्थेस, वरील उपयुक्त जिनसा विकत घेऊन महाराष्ट्राला सहज मदत करतां देण्याजोगी आहे.

## दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि.

तुम्ही दूरदृष्टीनें नियमानें ठराविक रक्कम बचत केल्यास तुम्हाला अगर तुमच्या नातिवाईकांना दरमहा निर्वेध मदत मिळण्याची आकर्षक योजना.

कंपनीकडे माहितीपत्रकांसाठीं आजच लिहा अगर भेटा.

हेड ऑफिस
८६६ सदाशिव पेठ, पुणें २

व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर

शाखाः—कराची, धुळें, नागपूर व हुबळी




## वि ज य टेक्सटाइल्स लि.

—येरंडवणा पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.


अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी



★ वृद्धापकाळची तरतूद
★ कुटुंबाचें संरक्षण
★ मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

हे सर्व प्रश्न आयुष्याचा विमा उतरल्यानेंच सुटूं शकतात. तरी आपला विमा पुणें येथील सुप्रसिद्ध

## कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि.

मध्येंच उतरा.

—सर्वत्र एजंट्स नेमणें आहेत.—


खालील पत्त्यावर लिहा अगर भेटा

अध्यक्षः—ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर

श्री. म. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर

अ

**पेडणेकर आणि कंपनी लि.,**



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.


फोन नं. २२७२८

**शेअर्स विकणें आहेत:--**

गोवर्धन डेअरी फार्म्स लि.,

गोवर्धनवाडी, पुणें १.












## साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितिमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

**व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी**










पुणें चीफ एजंट:–
न्यू दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.